नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

शाखा कार्यालय, अकोला

☎0724-2426552(कार्यालय) नवीनप्रशासकीय इमारत, दुसरा मजला
Email :- adtp_akola@rediffmail.com जिल्हाधिकारी कार्यालय परिसर , अकोला.

जा.क्र.मौ. चांदूर/ता.अकोला /एकत्रीकरण /स.नं. 29/1/ससंनरअ/ 620 दि. 04 /05/2016.

प्रति,

उपविभागिय अधिकारी

अकोला.

विषय:- भूखंड एकत्रीकरण

मौ. चांदूर ता. अकोला जि. अकोला येथील स.न. 29/1 मधील मंजूर अभिन्यासातील भू.क्र. 16 ते 27 क्षे. 1967.40 चौ.मि.

अर्जदार :- श्री. पुरुषोत्तम मुलकरणजी मालाणी, रा. अकोला

संदर्भ :- 1) आपले पत्र क्र. 1293/2016 दि. 13/04/2016.

2) छाननी शुल्क भरणा दि. 21.04.2016.

3) विकास शुल्क भरणा दि. 29.04.2016

महोदय,

विषयांकित प्रकरणातील भुखंड हे मौ. चांदूर ता. अकोला येथील स.न. 29/1मधील मंजूर अभिन्यासातील भू.क्र. 16 ते 27 अशी आहेत. विषयांकित भूखंड या कार्यालयाचे पत्र क्र. 2500, दि. 11/12/2003 अन्वये मंजूरीची शिफारस केलेल्या अभिन्यासातील भूखंड आहेत . उपविभागीय अधिकारी यांनी दि. 01.03.2004 च्या आदेशान्वये विषयांकीत जागेतील निवासी प्रयोजनार्थ अभिन्यास नकाशांना मंजूरी दिली असून त्यानुसार सदर जागा अकृषक मध्ये परावर्तीत झाली आहे . विषयांकीत प्रकरणातील भूखंड मंजूर प्रादेशिक योजना अकोलाच्या परिसर नकाशानुसार नाविकास क्षेत्रात अंतर्भूत असल्याने याबाबत परवानगी देणेबाबत संदर्भ केला असता पूर्वबांधिलकी म्हणुन परवानगी देणेबाबतची या कार्यालयाची सकारात्मक धारणा मा. सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र. 343, दि. 4.3.2016 नुसार मान्य केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मुळ मंजूर अभिन्यासातील भुखंड क्र. 16 ते 27 यांचे एकत्रीकरण प्रस्तावीत करुन 1967.40 चौ.मी. क्षेत्रफळाचा एकत्रीत भूखंड या प्रमाणे भूखंड एकत्रीकरणास मंजूरी अपेक्षिलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी नियमानुसार महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 124 नुसार आवश्यक विकास शुल्क रु. 13283/- चा भरणा अर्जदार यांनी दि. 29.4.2016 रोजी केलेला आहे. अर्जदाराने सादर केलेल्या नकाशावर लाल रंगाने दर्शविल्यानुसार दुरुस्तीसह खालील अटी व शर्तीस अधिन राहून भूखंड एकत्रीकरणाच्या नकाशास मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे.

04/5/16
Despatcher
S.D.O. Office (Civil)
AKOLA

1. सदर भूखंडावर बांधकाम करताना मंजुर अ,ब,क वर्ग नगरपरिषद करीता लागु असलेल्या बांधकाम नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
2. सदर भूखंडाचे विभाजन पुर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

3. या कार्यालयाचे पत्र क्र. 2500, दि. 11/12/2003 चे पत्रात नमुद अटींचे पालन करावे.
4. अर्जदार यांनी सादर केलेली माहीती अथवा कागदपत्रे खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात येईल.
5. जमिनीचा मालकी हक्क , चतु:सिमा पोच रस्ता किंवा कोणत्याही कारणास्तव भविष्यात वाद उपस्थित झाल्यास त्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
6. पावसाच्या पाण्याचे जलसवंर्धन (RAIN WATER HARVESTING) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.
7. उपविभागिय अधिकारी ,अकोला यांनी दि. 01.03.2004 अन्वये पारीत केलेल्या अकृषक आदेशातील अटी लागू राहतील.

प्रस्तुत प्रकरणी मंजूरीची शिफारस केलेल्या नकाशाची 1 प्रत या कार्यालयाचे अभिलेखार्थ ठेवुन उर्वरीत प्रती या सोबत पाठविण्यात येत आहेत.

सहपत्र:-वरीलप्रमाणे

प्र. सहाय्यक संचालक,
नगर रचना,अकोला

PLAN SHOWING THE PROPOSED AMALGAMATION OF PLOT NO16 TO 27 OF S. NO.29/1,SANCTIONED LAYOUT OF MOUJE-CHANDUR,TQ.+DIST.-AKOLA


LAYOUT SANCTIONED BY A.D.T.P.AKOLA VIDE LETT.NO.2500,DTD.-11-12-03
N.A. ORDER BY S.D.O.AKOLA, VIDE CASE NO. NAP 34/CHANDUR-89/2002-2003,DTD1-03-04

AREA STATEMENT

TOTAL AREA OF PLOT NO.16 TO 27 BEFORE AMALGAMATION (EXCLUDING CURVES)	1967.40 SQM
AREA OF PLOT NO.16 TO 27 AFTER AMALGAMATION (EXCLUDING CURVES)	1967.40 SQM




SITE PLAN
SCALE 1:5000




BEFORE AMALGAMATION PLOT NO.16 TO 27
AS PERSANCTIONED LAYOUT (AREA=1967.40SQM)
SCALE-1:250

PROPSED AMALGAMATION OF PLOT NO 16TO27



BLOCK PLAN
SCALE 1:500



AFTER AMALGAMATION PLOT NO.16 TO 27
(AREA=1980-12.56=1967.74SQM)
SCALE-1:250

OWNER'S SIGN

DRAWN BY